ठाणे, गुरुवार दि. १८ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**देशविकासाचे प्रश्न**

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही काही मोजक्या नागरिकांनाच आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती असावी, हे देशाचे दुर्दैव असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायधीश एन. व्ही. रमण यांनी ४ वर्षांपूर्वी व्यक्त केले होते.

......पान २ वर




सुप्रसिद्ध गायिकेचा जीवनप्रवास 'मंगला' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,६४० | ९५,२०० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्या पक्षात वादग्रस्त हिरॉईन घेतली पाहिजे. त्यानिमित्त का होईना पक्षाला लोकप्रियता मिळेल.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न....



काल (बुधवारी) आषाढी वारीचा सोहळा आहे. यानिमित्त पंढरपूरची नगरी हरिनामाच्या गजरात तल्लीन झाली आहे. काल पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांची पत्नी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांसोबत मानाचे वारकरी म्हणून शेतकरी बाळू शंकर अहिरे (वय ५५ वर्षे) आणि त्यांची पत्नी आशाबाई बाळू अहिरे (वय ५० वर्षे) मु. पो. अंबासन, ता. सटाणा जि. नाशिक यांना महापूजेचा मान मिळाला. ते मागील १६ वर्षापासून नियमितपणे वारी करत आहेत.

## राज्यातील बळीराजाला चांगले दिवस येऊ दे; शिंदेंचे साकडे

मी विठ्ठलाकडे नेहमी जनतेसाठी बळीराजासाठी मागणं मागत असतो. बळीराजा सुखी होऊ दे. चांगला पाऊस होऊ दे, चांगल पिक येऊ दे. त्याच्या जीवनात समृद्धी होई दे हे मागणं बळीराजाकडे मागितल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. या राज्यातील जनता सुखी होऊ दे. राज्यातील प्रत्येक घटक यांच्या जीवनात आनंदाचे दिवस विठ्ठलाने आणावे असं मागणं देखील मागितल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आज सळीकडे भक्तीमय वातावरण झालं आहे. यावर्षी मागील वर्षीपेक्षा जास्त वारकरी पंढरीत दाखल झाले आहेत. पांडुरंगाच्या आशिर्वादाने राज्याचा कारभार सुरु आहे. या राज्यातील बळीराजाला (पान २ वर)

### माझ्या आयुष्यातील भाग्याचा दिवस

हा माझ्या आयुष्यातील भाग्याचा दिवस आहे. कारण सलग तिसऱ्या वर्षी मला श्री विठ्ठल रुक्मिणीची महापुजा करण्याचं भाग्य लाभल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आपण सर्वजन वारकऱ्यांची भगवी पताका फडकत ठेवत आहात, त्याबद्दल आपले सर्वाचं आभार असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## पुढच्या वर्षी मुख्यमंत्री म्हणून यायचे की नाही...

मुंबई – विठ्ठलाच्या शासकीय महापूजेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कृषी मेळावा, पर्यावरणाची वारी आदी कार्यक्रमांना हजेरी लावली. यावेळी शिंदे यांनी लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ, शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा प्रचार केला. तसेच पुढच्या वर्षी मीच मुख्यमंत्री राहणार की नाही यावरही भाष्य केले.

पर्यावरणाची वारी सगळ्यात भारी. पर्यावरण राहिले तर आपण राहू. त्यामुळे आपण पर्यावरण वाचवले पाहिजे. मागील १५ वर्षांपासून ही पर्यावरणाची वारी सुरू आहे. यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरणीय बदल विभागाचे अभिनंदन करतो, असे शिंदे म्हणाले.

तसेच एक वारकरी, एक झाड ही संकल्पना आहे. पुढील वर्षी पालखी मार्गावर वृक्षारोपण करतोय. २० लाख बांबूची रोपे लावणार आहोत. बांबू किती उपयुक्त आहे हे आपल्याला लक्षात आले. आपण फक्त कोणाला बांबू.... तो पण लावावा लागतो. तो वेगवेगळ्या पद्धतीने लावावा लागतो. माणसाला पण शेवटी बांबूच लागतो, अशा शब्दांत शिंदेंनी राजकीय फटकेबाजी केली.

तसेच पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांनाही उत्तरे दिली. वारकऱ्यांसाठीच्या योजना, महामंडळाबाबत माहिती दिली. तसेच पुढील वर्षी तुम्हीच मुख्यमंत्री म्हणून येणार का, या प्रश्नावर पुढच्या वर्षी मी मुख्यमंत्री म्हणून यायचे की नाही हे विठुरायावर आणि जनता जनार्दनावर अवलंबून आहे, असे शिंदे म्हणाले. यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शन मंडप आणि टोकन दर्शन साठी तिरुपती बालाजीच्या धरतीवर १०३ कोटी रुपये मुख्यमंत्र्यांनी घोषित केले आहेत. (पान २ वर)

### माझी लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर

# आता माझा लाडका भाऊ योजनेची घोषणा!



**मुंबई – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज माझी लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर आता माझा लाडका भाऊ योजनेचीदेखील घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान राज्याचं अर्थसंकल्प सादर केलं. यावेळी अजित पवार यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. या योजनेवरुन विरोधकांकडून फक्त महिलांसाठीच योजना का जाहीर केली? म्हणून आक्षेप घेतला जात होता. महाराष्ट्रातील बेरोजगारांसाठी सरकार का काही करत नाही? असा सवाल विरोधकांकडून केला जात होता. यानंतर अखेर विरोधकांचा हा आक्षेप लक्षात घेत राज्य सरकारने राज्यातील बेरोजगारांसाठीदेखील मुख्यमंत्री माझा लाडका भाऊ योजना सुरु केली आहे.**

### योजनेसाठी नेमकी पात्रता काय?

- या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी पहिली अट म्हणजे अर्ज करणारा तरुण हा मूळचा महाराष्ट्राचा असावा.
- या योजनेचा लाभ किंवा महाराष्ट्राचे विद्यार्थी किंवा तरुण पात्र असतील. त्याचे वय केवळ १८ ते ३५ वर्ष वय इतक्या दरम्यान असणे अपेक्षित आहे.
- लाभार्थी तरुणाचं शिक्षण हे किमान १२ वी पास किंवा आय.टी.आय, डिप्लोमा किंवा पदवीधर असणं अपेक्षित आहे.
- सर्वात महत्त्वाची आणखी एक अट म्हणजे अर्जदाराचं बँक खातं हे आधार कार्डशी संलग्न किंवा जोडलेले असायला हवं.
- अर्जदार हा विद्यार्थी नसावा. त्याचं शिक्षण सुरु नसावं. तसेच तो फक्त बरोजगार असावा.
- या सर्व अटी पूर्ण करणाऱ्या बेरोजगार तरुणांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे.

### कुणाला किती पैसे मिळणार?

मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार या योजनेतून लाभार्थी तरुणांसाठी तीन प्रकारचं वर्गीकरण करण्यात आलेलं आहे. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, आय.टी.आय किंवा डिप्लोमा उत्तीर्ण विद्यार्थी आणि पदवीधर विद्यार्थी अशा तीन प्रकारचं शिक्षण घेतलेल्या बेरोजगार तरुणांना सरकार सहा महिन्यांची इंटर्नशिप मिळवून देणार आहे. सरकार लाभार्थी तरुणांना वेगवेगळ्या कारखान्यांमध्ये मोफत प्रशिक्षण उपलब्ध करुण देणार आहे. तसेच प्रत्येकाला दर महिन्याला सरकारकडून प्रशिक्षणार्थी पैसे दिले जाणार आहेत. **यातील १२ उत्तीर्ण तरुणांना महिन्याला ६ हजार रुपये मिळतील. तर आय.टी.आय किंवा डिप्लोमा केलेल्या तरुणांना दर महिन्याला ८ हजार रुपये तसेच पदवीधर तरुणांना दर महिन्याला १० हजार रुपये पैसे सरकारकडून मिळणार आहेत.** सरकार लाभार्थी तरुणांच्या थेट बँक खात्यात दर महिन्याला पैसे पाठवणार आहे. त्यामुळे बेरोजगार तरुणांना या योजनेचा मोठा फायदा होणार आहे.

**थोडक्यात घडामोडी**

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानाचे पहिले लँडिंग-टेकऑफ यशस्वी



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून बुधवारी (दि.१७) प्रथमच सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास विमानाचे लॅन्डींग आणि त्यानंतर टेकऑफ करण्यात आले. एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडियाचे छोटे विमान विमानतळाच्या धावपट्टीवरून प्रथमच उतरवण्यात आले. त्यानंतर त्याच विमानाने उड्डाण करुन पनवेल नगरीवरून प्रथमच अगदी कमी उंचीवरुन गेलेल्या या छोट्या विमानामुळे नागरिकांमध्ये प्रचंड औत्सूक्य निर्माण झाले आहे. हे विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून चाचणी घेण्यासाठी आणण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर निश्चितच लवकरच विमानतळ सुरू होणार असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

## गुडन्यूज! लाडकी बहीण योजनेचे दोन्ही हप्ते एकत्रच मिळणार, रक्षाबंधनाला खात्यात ३ हजार रुपये जमा होणार!

नागपूर : महाराष्ट्र सरकारकडून 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत महिलांना दरमाहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. योजनेची घोषणा झाल्यापासूनच अर्ज करण्यासाठी महिलांची झुंबड उडाल्याचं पाहायला मिळालं होतं. सुरुवातील अर्ज करताना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. आता अनेक महिलांची अर्जाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता या योजनेचे पैसे खात्यात कधी जमा होणार? याकडे सर्व महिलांचं लक्ष लागलं आहे. याचसंदर्भात राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मोठी घोषणा केली आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली आहे.



अर्थमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री 'लाडकी बहिण योजने'चे पैसे महिलांच्या खात्यात रक्षाबंधनाच्या दिवशी जमा होणार आहेत. जुलै आणि ऑगस्ट महिन्याची रक्कम रक्षाबंधनाला लाभार्थी महिलांना मिळणार आहे. राज्यसरकारकडून महिलांना राखीची भेट दिली जाणार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र सरकानं जाहीर केलेली योजना आहे. जर तुम्ही अजूनही या योजनेसाठी अर्ज केला नसेल, तर अजूनही अर्ज करण्याची मुदत संपलेली नाही. तुम्ही अर्ज करू शकता. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमाहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. म्हणजेच, प्रतिवर्ष १८ हजार रुपये मिळणार आहेत.

### हॅप्पी मोहर्रम...!






ठाणे येथे मोहर्रमचे औचित्य साधून चरई परिसरातून ताजीया मोहर्रमची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शांततापूर्ण वातावरणात ही रॅली संपन्न झाली. (छाया, मनोज सिंह)

## खासगी नोकऱ्यांमध्ये १०० टक्के आरक्षणाबाबत कर्नाटक सरकारचा यू-टर्न, मुख्यमंत्र्यांकडून पोस्ट डिलीट

बंगळुरू : कर्नाटक सरकारने खासगी कंपन्यांमध्ये क आणि ड श्रेणीच्या पदांवर स्थानिकांसाठी १०० टक्के आरक्षण अनिवार्य करण्याच्या विधेयकावर यू-टर्न घेतला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून स्थानिक कन्नड भाषिकांना खाजगी कंपन्यांमध्ये १०० टक्के आरक्षणासंदर्भातील पोस्ट काढून टाकली आहे.

या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापल्यानंतर कर्नाटक सरकारचे मंत्री डॅमेज कंट्रोल करण्यात गुंतले आहेत. राज्याचे कामगार मंत्री संतोष लाड यांनी या संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण देताना सांगितले की, खासगी कंपन्यांमध्ये स्थानिक लोकांसाठी ७० टक्के आणि व्यवस्थापकीय स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

यापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले होते की, काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील सर्व खाजगी उद्योगांमध्ये क आणि ड श्रेणीच्या



पदांसाठी १०० टक्के कन्नड लोकांची भरती अनिवार्य करण्यासाठी विधेयक मंजूर करण्यात आले आहे. तसेच, आम्ही कन्नड समर्थक सरकार असल्याचे (पान २ वर)

### कर्नाटकचे स्थानिक कोण?

कर्नाटकात जन्मलेले, १५ वर्षांपासून राज्यात वास्तव्य करणारे, कन्नड भाषेत प्रवीण असलेले आणि नोडल एजन्सीची आवश्यक परीक्षा उत्तीर्ण असलेलेच उमेदवार स्थानिक मानले जाणार आहेत. बंगळुरूमधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक इतर राज्यातील कर्मचारी आहेत. बहुतांश उत्तर भारत, आंध्र आणि महाराष्ट्रातील आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार बंगळुरुतील एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकांना कन्नड येत नाही.

## राज्यसभेत भाजपची वाट अवघड

**नवी दिल्ली : संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ जुलैपासून सुरू होत आहे. विरोधकांनी पुन्हा सरकारला कोंडीत पकडण्याची रणनीती आखली आहे. त्याचवेळी राज्यसभेत भाजपच्या ८६ जागा आहेत आणि मित्रपक्षांसह एनडीएकडे १०१ जागा आहेत. चार वर्षांनंतर भाजपचे संख्याबळ ९०च्या खाली गेले आहे. १३ जुलै रोजी पक्षाचे ४ नामनिर्देशित सदस्य निवृत्त झाले. राज्यसभेतील एकूण खासदारांची संख्या २४५ आहे. सध्या २२६ खासदार आहेत. यामध्ये बहुमताचा आकडा ११४ इतका आहे. एनडीएकडे बहुमताच्या आकड्यापेक्षा १३ जागा कमी आहेत. या दृष्टिकोनातून पाहता विधेयक मंजूर करण्यात सरकारला अडचणी येऊ शकतात.** (पान २ वर)




- राज्यसभेतही भाजप बहुमतापासून दूर
- विधेयके पास करताना घाम फुटण्याची चिन्हे
- बहुमत न मिळाल्यास ४ विधेयके अडकणार!

### एनडीएला ७ राज्यांमधून राज्यसभेच्या जागा मिळण्याची आशा

रिक्त असलेल्या १९ जागांवर लवकरच निवडणूक होणार आहे. भाजप आणि मित्रपक्षांना ७ राज्यांमधून जागा मिळण्याची शक्यता आहे. एनडीएच्या गणितानुसार त्यांना बिहार, महाराष्ट्र आणि आसाममधून राज्यसभेच्या २-२ जागा आणि हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरामधून १-१ राज्यसभेच्या जागा मिळू शकतात. राज्यसभेत ज्या चार जणांना उमेदवारी देण्यात आली आहे, तेही सरकारला पाठिंबा देतील, असे मानले जात आहे, कारण सरकारने त्यांना वरिष्ठ सभागृहात आणले आहे. सामान्यतः, राज्यसभेचे नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र असतात, परंतु पारंपारिकपणे ते ज्या पक्षाने त्यांना नामनिर्देशित केले आहे त्याला पाठिंबा देतात.



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## भाजपाने हिंदुत्वाचे करावे चिंतन

ज्योतीर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंची भेट घेतली. कोणाचे हिंदुत्व खरे हे समजून घ्यावे लागेल. पण जो विश्वासघात करतो, तो कधी हिंदुत्ववादी नसतो, असे ज्योतीर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटले आहे. त्यामुळे भाजप, शिवसेना एकनाथ शिंदे यांच्या गोटात खळबळ माजली आहे. अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर जाऊन ठाकरे कुटुंबीयांचा पाहुणचार स्वीकारला. या भेटीवेळी बोलताना, उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झाला आहे, जोपर्यंत ते पुन्हा मुख्यमंत्री होत नाही तोपर्यंत दु:ख जाणार नाही, अशा शब्दात त्यांनी खंत व्यक्त केली. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्यावर सातत्याने भाजपकडून हिंदुत्त्व सोडल्याचा आरोप केला जात आहे. आता, ज्योतीर्मठाच्या शंकराचार्यांना घरी बोलावून उद्धव ठाकरेंनी भाजपच्या आरोपाला स्पष्ट उत्तर दिले आहे.

त्यामुळे, शंकराचार्य – उद्धव यांच्या भेटीबद्दल भाजपची नेमकी काय प्रतिक्रिया येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता, भाजप मुंबईचे अध्यक्ष आणि आमदार आशिष शेलार यांनी या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. मात्र, शंकराचार्यांवर बोलण्याची आपली लायकी नाही, असेही ते म्हणाले. ज्योतीर्मठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या भेटीनंतर प्रतिक्रिया दिली. कोणाचं हिंदुत्व खरे हे समजून घ्यावे लागेल. पण जो विश्वासघात करतो तो कधी हिंदुत्ववादी नसतो, असे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटले होते. तसेच, उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होत नाहीत, तोपर्यंत दु:ख जाणार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. आता, शंकराचार्यांच्या विधानावर भाजप नेते आशिष शेलार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी त्यांच्या विधानावर टिप्पणी करणार नाही, माझी तेवढी लायकी नाही. पण मुंबई व महाराष्ट्रात स्पष्टता आहे की, उद्धव ठाकरेंनी हिंदूत्व सोडले आहे. ठराविक मतांचे लांगुलचालन करण्यासाठी त्यांनी हिंदूत्व व बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत, अशी प्रतिक्रिया आशिष शेलार यांनी दिली. त्यामुळे, ठाकरे आणि शंकराचार्य यांच्या भेटीनंतर भाजपची चांगलीच गोची झाल्याचे दिसून येत आहे. प्रतिक्रिया देतानाही, प्रतिक्रिया टिप्पणी करणार नाही, असे त्यांना म्हणावे लागत असल्याचे दिसून येत आहे.

आपण सगळे हिंदू आणि सनातन धर्माचे पालन करणारे लोक आहोत. पुण्य पापाची भावना आपल्याकडे सांगितली आहे . सगळ्यात मोठा घात हा विश्वासघात असतो. उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झालेला आहे , याबाबतची पीडा अनेकांना आहे. त्यांच्या निमंत्रणानंतर मी मातोश्रीवर आलो त्यांनी माझे स्वागत केले. मी त्यांना सांगितले, जोपर्यंत तुम्ही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर खुर्चीवर परत बसत नाहीत तोपर्यंत लोकांच्या मनातील दुःख कमी होणार नाही. कोणाचे हिंदूत्व खरे हे समजून घ्यावे लागेल. पण जो विश्वासघात करतो तो कधी हिंदुत्ववादी नसतो. जो विश्वासघात सहन करतो तो हिंदू असतो. जनतेचा सुद्धा अपमान करण्यात आलेला आहे, जनमताचा अनादर करणे हे चुकीचे आहे, असे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटले आहे.

भाजपाने अनेकवेळा उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडल्याचा आरोप केला आहे. परंतु उद्धव ठाकरे हे नेहमीच या वादापासून दूर राहिले आहेत. उद्धव ठाकरे यांनी भाजपा व विरोधकांच्या आरोपाला उत्तर देताना शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांच्या विधानाचा दाखला दिला आहे. कारण भाजपाने हिंदुत्वाचा मुद्दा घेत उद्धव ठाकरेंना कोंडीत पकडले होते. भाजपाच्या मते, उद्धव ठाकरे यांना लोकच हिंदुत्वाचे विरोधक म्हणतात असे भासवले होते. परंतु तथाकथित हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या भाजपाला चपराक दिली आहे.

भाजपाचे हिंदुत्व बेगडी आहे. हिंदुत्व कधी कोणाचा विश्वासघात करीत नाही, असे शंकराचार्यांना सुचवायचे आहे. एखाद्या व्यक्तीची हेटाळणी किती करावी याला मर्यादा आहे. ती भाजपाने तोडल्यामुळेच शंकराचार्यांना उत्तर द्यावे लागले, असेच दिसते. भाजपा हिंदुत्वाच्या नावावर विविध तडजोड्या करत आहे, हे पक्षश्रेष्ठींना कसे चालते ? त्यामुळे शंकराचार्यांनी दिलेल्या उत्तरावर भाजपाने आत्मचिंतन करणे श्रेयस्कर ठरेल, असे वाटते.

## राज्यसभेत भाजपची वाट अवघड

**(पान १ वरून) राज्यसभेच्या १९ रिक्त जागांचे गणित–** राज्यसभेच्या सध्या रिक्त असलेल्या १९ जागांपैकी ४ जम्मू–काश्मीरमधील आणि ४ नामनिर्देशित सदस्यांसाठी आहेत. तर, उर्वरित ११ जागा वेगवेगळ्या राज्यांतील आहेत, ज्यात आसाम, बिहार, महाराष्ट्र, हरियाणा, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि त्रिपुरा यांचा समावेश आहे. यापैकी १० जागा राज्यसभेच्या खासदारांनी लोकसभा निवडणूक लढवल्यामुळे आणि जिंकल्यामुळे रिक्त झाल्या आहेत. भारत राष्ट्र समिती (BRS) नेत्याने काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने एक जागा रिक्त झाली आहे. बीआरएस नेते के केशव राव यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या जागांसाठी निवडणूक आयोगाने अद्याप निवडणुकीच्या तारखा जाहीर केलेल्या नाहीत.

**सरकारची ही ४ महत्त्वाकांक्षी विधेयके अडकू शकतात –** १. विमा सुधारणा कायदा – विमा क्षेत्राला मोठ्या सुधारणांसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू शकते. विमा दुरुस्ती विधेयक हा क्रांतिकारी कायदा मानला जात आहे. ज्या पद्धतीने आघाडीचे सरकार आहे आणि थेट विदेशी गुंतवणुकीची मर्यादा ७४ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची चर्चा भाजप सरकारने ज्या पद्धतीने केली आहे, त्या स्वरूपात पास होणार नाही, असे दिसते.

**२. डिजिटल इंडिया कायदा –** मागच्या वेळी आयटी राज्यमंत्री असलेले राजीव चंद्रशेखर यांनी या कायद्याबाबत खूप प्रचार केला होता. त्याचे फायदे त्यांनी प्रसारमाध्यमांना उघडपणे सांगितले होते. आता ते निवडणुकीत पराभूत झाले आहेत, त्यामुळे त्यांना हा कायदा आणता येणार नाही. २३ वर्षे जुन्या आयटी कायद्याच्या जागी मोदी सरकारला हा कायदा आणायचा आहे.आयटी कायद्यात इंटरनेट हा शब्द नाही, असे सरकारचे म्हणणे आहे. नवीन कायदा सायबर सुरक्षा, एआय, गोपनीयता आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याबद्दल बोलतो. कायदा मोडल्यास दहा वर्षांचा कारावास आणि दंडाच्या तरतुदीमुळे विरोधक घाबरले आहेत.

**३. बियाणे विधेयक –** एनडीए सरकार बियाणे विधेयक २०१९ आणण्यासाठी अनेक दिवसांपासून प्रयत्न करत आहे. मागील सरकारच्या काळात शेतकरी आंदोलनातही या विधेयकाला कडाडून विरोध झाला होता. सरकारला बीज विधेयक १९६६ बदलायचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे बियाणे मिळून कृषी उत्पादन वाढेल, असा सरकारचा विश्वास आहे. खराब आणि बनावट बियाणे बनवणाऱ्या कंपन्यांचा नायनाट केला जाईल.

**४. वीज बिल –** वीज (दुरुस्ती) विधेयक २०२२ ८ ऑगस्ट २०२२ रोजी सादर करण्यात आले. दोन्ही सभागृहात ते मंजूर होऊ शकले नाही. संसदेतील तीव्र विरोधामुळे हे विधेयक सरकारला हवे तसे मंजूर होणार नाही. विरोधी पक्ष, बिगर भाजप शासित राज्ये आणि सरकारी वीज कंपन्यांनी या विधेयकाला विरोध नोंदवला आहे. या विधेयकानुसार एकाच क्षेत्रातील अनेक वीज कंपन्यांना परवाने दिले जाणार आहेत. जसे तुम्ही मोबाईलसाठी तुमच्या आवडीचे नेटवर्क निवडता. त्याचप्रमाणे वीज कंपनीचीही निवड करता येणार आहे. विधेयकातील हा बदल नागरिकांच्या वीज पुरवठा आणि दर ठरवण्याच्या अधिकारात घुसखोरी करणारा असल्याचे विरोधकांचे मत आहे. या विधेयकावर चर्चा व्हायला हवी.

## पुढच्या वर्षी मुख्यमंत्री म्हणून यायचे की नाही–शिंदे

**(पान १ वरून)** भाविकांना मोठ्या प्रमाणात विठुरायाचे सहज सुलभ दर्शन घेता येणार आहे. वारकरी शेतकरी कष्टकरी सगळ्यांच्या आयुष्यात चांगले दिवस येऊ दे हे विठुरायाला मुख्यमंत्र्यांनी साकडे घातले.

पुढे एकनाथ शिंदे म्हणाले, वारी हा आनंदाचा दिवस आहे. सलग तिसऱ्यांदा मला देवाची पूजा करण्याचा मान मला मिळालं आहे. ही पांडुरंगाची कृपा आहे. मागील वर्षापेक्षा वारकऱ्यांची संख्या ३० टक्के अधिक वाढली आहे. अनेक योजना नागरिकांना दिल्या आहेत. पांडुरंगाच्या आशीर्वादाने हे सरकार आपला कारभार करत आहेत. मंदिर समितीने केलेल्या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेणार आहे.

## राज्यातील बळीराजाला चांगले दिवस येऊ दे; शिंदेंचे साकडे

**(पान १ वरून)** चांगले दिवस येऊ दे, त्याचं पिक चांगलं येऊ दे, चांगला पाऊस येऊ दे शेतकऱ्यांच्या जीवनात सोन्याचे दिवस येऊ दे असं, असं साकडं एकनाथ शिंदेंनी विठ्ठलाच्या चरणी घातल्याचं त्यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्र्यांसह मंत्री गिरीश महाजन, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार प्रतापराव जाधव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## खासगी नोकऱ्यांमध्ये १०० टक्के आरक्षणाबाबत कर्नाटक सरकारचा यू–टर्न

**(पान १ वरून)** सांगत कन्नड लोकांचे कल्याण हे आमचे प्राधान्य आहे, असे ते म्हणाले होते. मात्र, यावरून वाद वाढल्यानंतर सिद्धरामय्या यांनी पोस्ट हटवली आहे.

**नवीन विधेयक मंजूर –** रम्यान, वादानंतर कर्नाटक सरकारने नव्या विधेयकाला मंजुरी दिली आहे. कामगार मंत्र्यांनी सांगितले की, राज्य सरकारने व्यवस्थापन स्तरावर ५० टक्के आणि बिगर व्यवस्थापन स्तरावरील ७० टक्के लोकांना खासगी कंपन्यांमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, आवश्यक कौशल्ये राज्यात उपलब्ध नसल्यास त्यांना आउटसोर्स करून येथे काम दिले जाऊ शकते, असे ते म्हणाले. त्याचवेळी कर्नाटकचे मंत्री रामलिंगा रेड्डी म्हणाले की, कर्नाटकात राहणाऱ्या लोकांनी कन्नड भाषा शिकली पाहिजे.


### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**पाणी पुरवठा विभाग**
**निविदा सुचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील उथळसर प्रभाग समिती अंतर्गत १) "**दुषीत पाणी तक्रार निवारण करणेसाठी चरई गणेश टॉकीज रस्ता येथे** १०० **मीमी एम.एस. व** १५० **मीमी डी.आय. जलवाहिनी टाकणे**" २) "**उथळसर प्रभाग समिती जेल जलकुंभ कार्यालयाची सर्वांगिण दुरुस्ती करणे**" व ३) "**उथळसर प्रभाग समिती क्षेत्रातील आझादनगर चोवीस तास टॅपींग पॉइंट बंद करुन ऋतुपार्क वॉटर डिस्ट्रिक्ट अंतर्गत पाणी पुरवठा कार्यान्वीत करणे**" या तीन कामांकरीता ऑनलाईन पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारां विरुद्ध शासकीय / निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.विस्तृत निविदा सूचना व निविदा प्रपत्र अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दि.१८/०७/२४ पासुन दि.२५/०७/२४ पर्यंत १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा अधिकृत संकेतस्थळावर दि.२५/०७/२४ रोजी सांयकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. शक्य झाल्यास सदर निविदा दि.२६/०७/२०२४ रोजी सांयकाळी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु-उथळ /१३७/२०२४-२५ — **सही/-**
दि . १८/०७/२०२४ — कार्यकारी अभियंता
**pls visit our oficial web-site** — ठाणे महानगरपालिका,ठाणे



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/12528/18/24
Inquiry/case No. : ACC/III/748/2024
Name of the Trust : श्री चिंचेश्वर महाशिवरात्री उत्सव मंडळ
**Address of the Trust :** हाउस नं. ९८२, बदलापूर गाव, ताल. अंबरनाथ, बदलापूर, ठाणे, ठाणे, अंबरनाथ, बदलापूर
**Name of the Applicant :** श्री. दिनेश सदानंद धुमाळ

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



### महाराष्ट्र शासन
**ई–निविदा सुचना**
**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**
कार्यकारी अभियंता, घाटघर जलविद्युत विभागीय पथक क्र.३,
सहकार विद्यामंदीर समोर, कळवा, ठाणे ४००६०५
दुरध्वनी क्रमांक ०२२–२५३७७९१९
ई–मेल– eeghed3@yahoo.com

**ई–निविदा विनिर्देश क्र. :– काअ / घाजविविप–३/०४/२०२४–२५**
Portal - https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता, घाटघर जलविद्युत विभागीय पथक क्र.३, कळवा, ठाणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडुन खालील कामा करिता ब १ ई – निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन ) निविदा मागवित आहे.
निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, घाटघर जलविद्युत विभागीय पथक क्र.३,कळवा, ठाणे यांनी राखून ठेवला आहे.

अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

**कामाचे संक्षिप्त वर्णन**

कामाचे नाव :– बिरवाडी उपसा सिंचन योजना, भातसानगर, ता. शहापूर, जिल्हा ठाणे येथे २२/३.३ के व्ही कळयंत्र आवारात ३ फेज, १२५० के व्ही ए, २२/३.३ के व्ही, ५० Hz क्षमतेचा नवीन Power Transformer पुरवठा, बसविणे, तपासणी व कार्यान्वीत करणे.
जिल्हा : ठाणे

| | | |
|---|---|---|
| १ | निविदेची अंदाजीत किंमत रुपये | रु. २९,१४,७६९/– (वस्तू व सेवा करासहित) |
| २ | ई–निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक २४/०७/२०२४ ते दिनांक ०७/०८/२०२४ |
| ३ | ई–निविदा उघडणे | दिनांक ०९/०८/२०२४ |

खालील ठिकाणी ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१ संकेतस्थळ – http://mahatenders.gov.in
( सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२ कार्यकारी अभियंता, घाटघर जलविद्युत विभागीय पथक क्र.३, कळवा, ठाणे, कार्यालयातील सूचनाफलक.

सही/–
(उ. बा. मुडबिद्रीकर)
कार्यकारी अभियंता
घाटघर जलविद्युत विभागीय पथक क्र.३
कळवा, ठाणे

जा.क्र. काअ/घाजविविक्र.३/प्रशा–४/बिरवाडी/४०९/२०२४ — दिनांक : १२/०७/२०२४

क्र. जिमाका /ठाणे/जाहिं। २०२४–२५/११


## मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनाची माहिती देणेकामी, राजकीय पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते यांचे समवेत बैठक संपन्न!



कल्याण – जास्तीत जास्त महिलांना मुख्यमंत्री –माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्याकरिता, निवडणूक प्रभाग निहाय ३६६ केंद्रांत तसेच एकूण २८ नागरिक आरोग्य केंद्रांत,महापालिकेच्या १० प्रभागात, तसेच २७७ अंगणवाडी केंद्रात मदत कक्ष उघडून सदर योजना राबविण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिलेले आहेत, त्या अनुषंगाने सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच माजी पालिका सदस्य यांचे समवेत नुकतीच महापालिकेच्या आचार्य अत्रे रंग मंदिरात एक बैठक संपन्न झाली. सदर बैठकीतील उपस्थितांना मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण योजनेबाबत सविस्तर माहिती देऊन या योजनेचे ऑफलाइन आणि ऑनलाइन अर्ज कसे भरावेत याबाबत महिला व बालकल्याण विभागाच्या उपायुक्त स्वाती देशपांडे कुलकर्णी व सुषमा खरात– मुख्य सेविका एकात्मिक बालविकास प्रकल्प यांनी मार्गदर्शन केले. आज पर्यंत सदर योजनेचे एकूण ६३०४ ऑनलाईन अर्ज व एकूण ११६०८ ऑफलाईन अर्ज भरण्यात आले आहेत. महिला बचत गटांमार्फत भरण्यात येणाऱ्या प्रत्येक ऑनलाइन फॉर्म मागे रु.५०/– इतके मानधन देण्यात येणार आहे .तरी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,०००/– च्या आत असेल अशा कुटुंबातील महिलांनी (वय वर्षे २१ते ६५) तसेच केशरी व पिवळे रेशन कार्डधारक महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत करण्यात येत आहे.


### कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वच्छ भारत – एक कदम स्वच्छता की ओर | बेटी बचाओ बेटी पढाओ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नगरपरिषद दुबे रुग्णालय इंमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व ) कुळगांव, पिन–४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे. इंमेलः– coud.kulgaonbadalapurmaharashtra.gov.in. वेबसाईटः– https://kbmc.gov.in

जा.क्र : कुबनप / साबां /५५२ /२०२४–२५ — दिनांक : १६/०७/२०२४

जाहिर ई– निविदा सुचना क्र. ०४/२०२४–२५

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील प्रस्तावित खालील एकुण ०३ कामे करणेसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई–निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. १८/०७/२०२४ ते दि. २५/०७/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा दि. २६/०७ /२०२४ रोजी दुपारी.४.०० नंतर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रू. |
|---|---|---|
| १ | कुबनप हद्दीतील न.प.च्या व्यायाम शाळेला साहित्य पुरविणे व वातानुकुलीत यंत्रणा बसविणे. | ९९,९९,६०६/– |
| २ | कुबनप हद्दीतील प्रभाग क्र. ४६ मधील नागरीकांच्या सोयीसाठी जेष्ठ नागरीक कट्टा व प्रवासी थांबा बनविणे. | ४९,९९,१४०/– |
| ३ | कुबनप हद्दीतील प्रभाग क्र. ४६ मधील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | १,४९,९९,०८८/– |

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

शिक्का

सही/–
(योगेश गोडसे)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव



### अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

स्वच्छ भारत – एक कदम स्वच्छता की ओर | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.अंनप/पापुवजनि/२०२४–२५/१३० — दि. १५/०७/२०२४

**कोटेशन नोटीस**

अंबरनाथ नगरपरिषदेस खालील काम करावयाचे असुन, नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन त्याबाबत सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. ज्या कोणास सदर काम करावयाचे असेल त्यांनी सदर कामांचे दर सर्व करांसह बंद पाकीटात खाली सही करणार यांचेकडे दि. २९/०७/२०२४ रोजी सायं ३.०० वाजे पर्यंत आणून द्यावेत. तसेच आलेली कोटेशन त्याच दिवशी किंवा प्रशासनाच्या सोयीनूसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे. तसेच खालील पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. (GST वगळून) | इसारा रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ पूर्वेकडील वॉर्ड क्र.५६ पालेगांव येथील जनाईन गवळी यांचे घर ते जयराम म्हसकर, शनवार यांचे घर, कैलास म्हसकर यांच्या घरापर्यंत गटार बांधणे. | ८,०४,९१२/– | ८,०४९/– |

**१) तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. ०१**
अ) पॅनकार्ड
ब) ईपीएफ प्रमाणपत्र.
क) कॉन्ट्रॅक्टर परवाना.
ड) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र.
इ) इसारा रकमेचा डी. डी

**२) वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. ०२**
अ) मूळ प्रतितील दरपत्रक.

टिप :– सदर कोटेशन नगरपरिषदेच्या www.ambarnathcouncil.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
प्रत :– सुरक्षा विभाग नगरपरिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दिकरिता.

शिक्का

सही/–
(डॉ. प्रशांत रसाळ)
प्रशासक,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/ MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/ PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/ इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/




■ जागा : १५२
■ पदाचे नाव तपशील:
१ विद्याशाखांचे डीन
२ प्राध्यापक
३ सहयोगी प्राध्यापक / उप ग्रंथपाल
४ सहयोगी प्राध्यापक / सहयोगी ग्रंथपाल
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) संबंधित विषयात Ph.D. /55% गुणांसह पदव्युत्तर पदवी (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) संबंधित विषयात Ph.D. (ii) पुस्तके आणि संशोधन/पॉलिसी पेपर म्हणून १० प्रकाशने. (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: संबंधित विषयात Ph.D+५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+ पुस्तक ०७ प्रकाशने+ ०८ वर्षे अनुभव+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी + ०८ वर्षे अनुभव
पद क्र.४: ५५% गुणांसह पदव्युत्तर पदवी+NET/SET किंवा ग्रंथालय विज्ञान/माहिती विज्ञान/दस्तऐवजीकरण विज्ञान पदव्युत्तर पदवी
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: खुला प्रवर्ग: ५००/- मागासवर्गीय: २५०/-
■ भरलेले अर्ज सादर करण्याचा पत्ता: The Registrar, University of Mumbai, Room No. 25, Fort, Mumbai-400032
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०७ ऑगस्ट २०२४
■ वेबसाईट https://mu.ac. in/

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा

■ उपलब्ध पाठ्यक्रम (कोर्स):
अ. क्र. कोर्सचे नाव पद संख्या कालावधी
१ अग्निशामक (फायरमन) कोर्स - ०६ महिने
२ उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी कोर्स ४० ०१ वर्षे
■ शैक्षणिक पात्रता:
अग्निशामक (फायरमन): ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण SC/ST/NT/VJNT/SBC/OBC/ EWS: ४५%गुण
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: ५०% गुणांसह पदवीधर SC/ST/NT/VJNT/SBC/ OBC/EWS: ४५%गुण
■ शारीरिक पात्रता:
कोर्सचे नाव उंची वजन छाती
अग्निशामक (फायरमन) १६५ सें.मी. ५० kg ८१/८६ सें.मी
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी १६५ सें.मी. ५० ज्ञस ८१/८६ सें.मी
■ वयाची अट: १५ जून २०२४ रोजी, SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC/EWS: ०३ वर्षे सूट
अग्निशामक (फायरमन): १८ ते २३ वर्षे
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी: १८ ते २५ वर्षे
■फी : कोर्सचे नाव खुला प्रवर्ग राखीव प्रवर्ग
अग्निशामक (फायरमन) ६००/- ५००/-
उपस्थानक अग्नि प्रतिबंध अधिकारी ७५०/- ६००
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी: २३ सप्टेंबर २०२४ पासून
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://mahafireservice.gov.in/

## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

### पनवेल पालिकेच्यावतीने मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत तीन फिरते मदत कक्ष लाभार्थ्यांच्या दारापर्यंत

# पालिका कार्यक्षेत्रात पाच प्रभागामध्ये वीस ठिकाणी मदत कक्ष व तीन फिरते मदत कक्ष सुरू




पनवेल : महिलांचे आरोग्य, पोषण व आर्थिक स्वावलंबनासाठी राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार महापालिका कार्यक्षेत्रातील आदिवासी पाड्यांवरील महिलांना या योजनेंतर्गत अर्ज भरता यावे यासाठी महापालिकेच्यावतीने एक पाऊल पुढे टाकत लाभार्थ्यांच्या दारी जाण्यासाठी मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून तीन फिरते मदत कक्ष सुरू करण्यात आले आहेत. ३१ ऑगस्ट पर्यंत सुरू असणाऱ्या या योजनेंतर्गत महिलांना अर्ज भरण्यासाठी पाच प्रभागामध्ये याआधी २० ठिकाणी मदत कक्ष उभारण्यात आली आहेत. आत्तापर्यंत या मदत कक्षाच्या माध्यमातून सुमारे पाच हजाराहून अधिक अर्ज भरण्यात आले आहेत. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थी महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महापालिकेने विशेष नियोजन केले आहे.या योजनेंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात डीबीटीद्वारे दरमहा दीड हजार इतकी रक्कम दिली जाणार आहे. उपायुक्त संतोष वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच प्रभागामध्ये २० ठिकाणी मदत कक्ष उभारण्यात आली आहेत. याठिकाणी अंगणवाडी, आशा सेविका, डेएनयुएलएम अंतर्गत बचत गटाच्या महिला, डाटा एन्ट्री ऑपरेटर, मदतनीस, शिपाई , सुरक्षा अधिकारी उपलब्ध करून देण्यात आले आहे.तसेच आता ३ मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून फिरते मदत कक्ष सुरु करण्यात आली आहेत. यामध्ये २ लिपिक टंकलेखक, १ महिला बचत गट मधील महिला आणि १ अंगणवाडी सेविका अर्ज भरण्यासाठी मदत करणार आहे. हे फिरते मदत कक्ष पनवेल हद्दीतील, सिडको हद्दीतील वीस आदिवासी पाडे, झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन ऑफलाईन ऑनलाईन फॉर्म भरणार आहेत.

आज या फिरत्या मदत कक्षाच्या माध्यमातून टेम्भोडे गाव, घोट भोईवाडा, रोहिंजन पिसार्वे या ठिकाणी जाऊन तेथील लाभार्थी महिलांचे अर्ज भरण्यात आले. या योजनेंतर्गत अधिक्षक प्रकाश गायकवाड, मोकल, समाजविकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, अभियंता गजानन देशमुख, डेएनयुएलएमच्या व्यवस्थापिका विनया म्हात्रे कार्यरत आहेत.

### महापालिका कार्यक्षेत्रातील मदत कक्षाची ठिकाणे

१.पनवेल- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, रोहिदास वाडा समाज मंदिर, संत साईबाबा शाळा, तक्का गाव (मराठी शाळा),

२.खारघर -खारघर प्रभाग समितीमध्ये टॅक्स ऑफिस, प्राईड सोसायटी ( सेक्टर -७), विठ्ठल मंदिर बेलपाडा, खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र

३.कळंबोली - कळंबोली प्रभाग समिती कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (रोडपाली), गणेश मंदिर सेक्टर ०८, स्वामी समर्थ मठ सेक्टर०४

४.कामोठे- कामोठे प्रभाग समिती कार्यालय,सिडको कम्युनिटी हॉल, सेक्टर २१, मोठा खांदा शाळा, छोटा खांदा मंदिर,

५.नावडे- नावडे उपविभागीय कार्यालय, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र फेज२,तळोजा पाचनंद, ग्रामपंचायत कार्यालय टेंभोडे गाव, ग्रामपंचायत कार्यालय रोहिंजण गाव

### पात्रता व आवश्यक कागदपत्रे

१. महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला.

२. लाभार्थ्यांचे आधार कार्डअसणे आवश्यक.

३. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्न दाखला. ( वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य)


४.बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.

५.पासपोर्ट आकाराचा फोटो

६. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रामणपत्र नसेल तर त्याऐवजी स्वत्:चे १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड / ओळखपत्र/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र /जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र किंवा प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे. (परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरूषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे जन्म दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे)

७. लाभार्थ्यांचे स्वतःचे आधार लिंक असलेले बँक खाते तसेच मोबाईल नंबर आधार कार्डाशी लिंक असणे आवश्यक.

८.लाभार्थ्यांनी आधारकार्डवरील नाव आहे तसे लिहणे बंधनकारक राहील.




# सुप्रसिद्ध गायिकेचा जीवनप्रवास 'मंगला' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर

सध्या सर्वत्र महिलांवर आधारित अनेक कथानक असलेले चित्रपट हे प्रेक्षकांच्या भेटीस येताना पाहायला मिळत आहेत. चित्रपटगृहांमध्ये या चित्रपटांना समस्त महिलावर्ग भरभरुन प्रतिसाद देताना पाहायला मिळत आहेत. महिला केंद्रित चित्रपटांच्या यादीत आता आणखी एक नवा कोरा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज होत आहे. या चित्रपटाचे कथानक हा एका गायिकेचा प्रवास मांडणारा आहे. 'मंगला' असे या चित्रपटाचे नाव असून नुकताच या नव्या चित्रपटाचं मोशन पोस्टर समोर आलं आहे. मंगला या गायिकेच्या खऱ्या आयुष्यातील खडतर प्रवास या चित्रकथेतून मोठ्या पडदयावर येणार आहे. मंगलावर झालेला ॲसिड अटॅक आणि त्या कठीण परिस्थितीशी तिने दिलेली झुंज या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. तसेच या ॲसिड अटॅक संबंधित कोणताही कायदा त्याकाळी नसल्याने योग्य तो न्याय न मिळाल्याने या लढ्याचा सामना मंगलाने कसा केला अशी खरीखुरी कथा पाहणं रंजक ठरणार आहे.

'रैश प्रोडक्शन प्रा.लि' आणि 'फक्त आणि फक्त एंटरटेनमेंट' प्रस्तुत 'मंगला' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा अपर्णा हॉशिंग यांनी उत्तमरीत्या पेलवली आहे. तर चित्रपटाच्या निर्मितीची बाजू अपर्णा हॉशिंग, यशना मुरली, मोहन पुजारी, मिलिंद फोडकर यांनी सांभाळली आहे. चित्रपटाची कथा आणि पटकथा सौरभ चौधरीची असून संवाद प्रथमेश शिवलकर याचे आहेत. तर संपूर्ण चित्रपटाचे संगीत शंतनु घटक याचे आहे.

मोशन पोस्टरवर पाठमोरी बसलेली महिला नेमकी कोण आहे?, ही भूमिका नेमकी कोणती अभिनेत्री साकारणार हे अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आलं आहे. एकूणच या चित्रपटाबाबत बोलताना दिग्दर्शिका अपर्णा हॉशिंग यांनी त्यांचा अनुभव शेअर करत अस म्हटलं की, हा चित्रपट महिलाकेंद्रित असून एका ज्ञात व अज्ञात महिलेच्या जीवनप्रवास दर्शिवणारा आहे. मंगला या चित्रपटात दिसणारी, गायनकलेची आवड असणारी ही महिला नेमकी कोण आहे हे लवकरच कळेल. हा चित्रपट आशयघन असून एका महान गायिकेचा प्रवास उलगडणार आहे.

# कळव्यात विठूभक्तांची मांदियाळी


## डॉ.जितेंद्र आव्हाड दिंडीत धरली फुगडी





ठाणे : कळवा येथील राष्ट्रवादी काँग्रेस –शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयात आज विठू भक्तांची मांदियाळी आली. चंद्रभागा नदीत अभिषेक करून आणलेल्या विठ्ठल–रखुमाईच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी सबंध कळवेकरांची रिघ लागली होती. या वेळी काढलेल्या दिंडीत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड हे भक्तिरसात तल्लीन झाल्याचे चित्र दिसून आले. वारकऱ्यांच्या सोबत त्यांनीही टाळमृदंगाच्या गजरात चक्क फुगडीचा फेरही धरला.

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात जाऊन विठूरायाचे दर्शन घेण्याची अनेकांची इच्छा असते. मात्र, सर्वांनाच वारीत सहभागी होणे शक्य नसते. ही अडचण ओळखून डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी विठ्ठल – रखुमाईची मूर्ती पंढरपूरच्या चंद्रभागा नदीत अभिषेक करून कावेरी सेतू येथील पक्ष कार्यालयाच्या आवारात विधिवत स्थापन केली होती. या मूर्तीसमोर नतमस्तक होण्यासाठी कळवा, विटावा, खारीगाव, पारसिकनगर, कळवा पूर्वे तील विठ्ठल भक्तांनी एकच गर्दी केली होती. पंढरपुरातील विठ्ठल मंदिराप्रमाणेच येथेही मांगल्य आणि पवित्रते वातावरण निर्माण झाले होते. या ठिकाणी डॉ.जितेंद्र आव्हाड हेदेखील विठुरायाच्या चरणी लीन झाले. या प्रसंगी विठ्ठल भक्तांनी काढलेल्या दिंडीत डॉ. आव्हाड हे तल्लीन होऊन सहभागी झाले. वारकऱ्यांसोबत त्यांनीदेखील टाक वाजवत, विठ्ठलाच्या गाण्यांवर ठेका धरला तसेच फुगड्यांचा फेरही धरला.





मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी ठाणे महापालिकेने सुरू केलेल्या मदत कक्षाला महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी बुधवारी सायंकाळी भेट दिली. प्रथम किसन नगर येथील शाळा क्रमांक २३ मधील मदत केंद्रात आयुक्त राव यांनी नोंदणी कर्मचारी तसेच उपस्थित महिलांशी संवाद साधला. त्यानंतर, नौपाडा येथील दिव्यांग मदत केंद्र येथे मदत कक्षाला भेट दिली. योजनेची माहिती मिळवण्यात किंवा अर्ज करण्यात कोणत्या अडचणी आहेत का हे आयुक्त राव यांनी जाणून घेतले. याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त अनघा कदम, सहायक आयुक्त सोपान भाईक आणि लक्ष्मण गरुडकर उपस्थित होते.

विजेअभावी बदलापुरकरांवर आरोग्य, उद्योग आणि पाणी संकट

# कार्यालये, बँका, शाळा, दुकानांसह सर्वसामान्य नागरिक जेरीस

बदलापूरः सुमारे तीन लाख लोकसंख्या असलेल्या आणि चौथी मुंबई अशी बिरुदावली मिरवणाऱ्या बदलापूर शहरात गेल्या काही वर्षात बिघडलेल्या वीज वितरण व्यवस्थेमुळे आता नागरिक मेटाकुटीस आले आहेत. एकीकडे विजेअभावी पिण्याचे पाणी मिळणेही दुरापास्त झाले असताना वीज नसल्याने ग्रामीण उपजिल्हा रूग्णालयातही वाताहत झाल्याचे चित्र दोन दिवसांपूर्वी दिसले. बदलापुरातील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांवरही वीजसंकट असून उद्योग चालवायचे कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शाळा, बँकाचे व्यवहार आणि दुकानदार हैराण आहेत.

गेल्या काही वर्षात अंबरनाथ आणि बदलापूर या चौथ्या मुंबईतील दोन शहरांची लोकसंख्या वेगाने वाढली. अनेका नामांकीत बांधकाम व्यावसायिकांनी बदलापूरसारख्या शहरात गृहसंकुले उभी केली. निसर्ग, पाणी आणि मोकळीक यामुळे शहराला नागरिकांनी पसंती दिली खरी मात्र आता शहराच्या लोकसंख्येला पायाभूत सुविधा पुरवणे यंत्रणांना कठीण होते आहे. त्यातही विजपुरवठा यंत्रणा काळानुरूप सक्षम झाली नाही. गेल्या काही दिवसात येथील महावितरणाच्या यंत्रणेने वीज पुरवठा करण्यासाठी सक्षम नसल्याचे दाखवून गुढघे टेकले आहेत. त्याचा परिणाम संपूर्ण शहरातील नागरिकांच्या आयुष्यावर होतो आहे. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यंत्रणेलाही सुरळीत वीजपुरवठा होत नसल्याने शहरात पाणीबाणी आहे. खुद्द प्राधिकरणाने याबाबत नागरिकांना सूचीत करत पाणी व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे. जलशुद्धीकरण केंद्राला होणारा पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून त्यासाठी स्थानिक आमदार, महावितरणाचे वरिष्ठ आणि स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क सुरू असल्याचे प्राधिकरणाच्या अभियंत्या माधुरी पाटील यांनी सांगितले आहे. दोनच दिवसांपूर्वी एका रोहित्राच्या दुरूस्तीमुळे येथील उपजिल्हा रूग्णालयाला पाच तास विजेविना काढावे लागले. रूग्णालयाची पर्यायी व्यवस्था सक्षम नसल्याने रूग्णांना त्याचा फटका बसला. त्यावरून गदारोळ झाल्यानंतर महावितरणाकडून रूग्णालायातील रोहित्राची दुरूस्ती करण्याऐवजी थेट नवे रोहित्र बसवून देण्यात आले.

### सहा महिन्यात २७५ वेळा वीज खंडीत

आधीच औद्योगिक वसाहतींभोवती वाढलेल्या रहिवासी इमारतींमुळे धोक्यात सापडलेल्या आणि स्थलांतरणाची टांगती तलवार असलेल्या बदलापूरच्या औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना आता सातत्याने खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्याचा फटका बसतो आहे. येथील उद्योजकांच्या बदलापूर इंडस्ट्रीयल वेल्फेअर असोसिएशन अर्थात बिवा संघटनेने गेल्या सहा महिन्यात २७५ वेळा वीज पुरवटा खंडीत झाल्याची नोंद केल्याची माहिती संघटेनेचे अध्यक्ष कुशल जैन यांनी दिली आहे. या औद्योगिक क्षेत्रात २९० कंपन्या असून त्यात कापड उद्योग, रसायन आणि अभियांत्रिकी कंपन्यांचा समावेश आहे. रासायनिक कंपनीत प्रक्रियेवेळीच वीज खंडीत झाल्यास काही अपघात घडण्याचीही भीती जैन यांनी व्यक्त केली आहे.

### शाळा, कार्यालयांनाही फटका

सातत्याने खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे लहान शाळा, दुकानदार, कार्यालयांनाही फटका बसतो आहे. बँकांचे कामही विजेअभावी खोळंबते. तर शीतगृह, शीतकपाट असणाऱ्या दुकानदारांना याचा त्रास सहन करावा लागतो आहे.

बदलापुरात विविध कारणांमुळे मध्यंतरी वीज पुरवठा खंडीत झाला होता. आता आवश्यक देखभाल दुरूस्तीची कामे सुरू आहेत. तशा सुचनाही मिळाल्या आहेत.
–सुधाकर सुराडकर, कार्यकारी अभियंता, महावितरण बदलापूर.

# दिवा रेल्वे स्थानकातील गृहफलाट रखडल्याने प्रवाशांचे हाल

कल्याण: मध्य रेल्वेच्या दिवा रेल्वे स्थानकातील गृह फलाटाचे काम (होम प्लॅटफॉर्म) गेल्या वर्षभरापासून रखडले आहे. हे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाकडून कोणत्याही हालचाली केल्या जात नसल्याने प्रवासी, रेल्वे प्रवासी संघटना तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. दिवा रेल्वे स्थानकात गेल्या वर्षभरापासून गृह फलाटाची (होम प्लॅटफॉर्म) बांधणी करण्यात येत आहे. दिवा रेल्वे स्थानकातील पश्चिम बाजूला हा फलाट आहे. या फलाटाची बांधणी करण्यापूर्वी रेल्वेने या जागेची मोजणी करून फलाट बांधण्यात येत असलेली जागा रेल्वेची असल्याचे नक्की केले होते. या फलाटाची बहुतांशी बांधणी झाल्यानंतर दिवा गावातील एका ग्रामस्थाने या फलाटाची कल्याण बाजूकडील काही जमीन आपल्या मालकी हक्काची असल्याचा दावा रेल्वे प्रशासनाकडे केला. या जागेचा मोबदला दिल्या शिवाय आपण याठिकाणी फलाटाची बांधणी करून देणार नाही, अशी अडवणुकीची भूमिका घेतली.




कचरा व्यवस्थापन करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी हायवे लगतच्या ग्रामपंचायतींना दिली भेट

# कचरा समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायतींनी कायमस्वरूपी उपाययोजना करा : रोहन घुगे

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे जिल्ह्यातील शहरालगत व हायवेलगतच्या ग्रामपंचायती मधील घनकचरा व्यवस्थापनाबाबत ठाणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. भिवंडी, कल्याण, शहापूर, अंबरनाथ तालुक्यातील डंपिंग ग्राऊंड, घनकचरा प्रकल्प, हायवेलगतच्या ग्रामपंचायती या ठिकाणी भेट देऊन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. ठाणे ग्रामीण भागात कचऱ्याची समस्या मोठी आहे. कचऱ्याच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा. ग्रामपंचायती अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे विविध प्रकारे विल्हेवाट करणे तसेच कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामस्थांनी देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

भिवंडी तालुक्यातील हायवे लगतच्या दिवे अंजुर, मानकोली, वडपे, पडघा आणि कोण या ग्रामपंचायतींना भेट देऊन तेथील घनकचरा व्यवस्थापनाबाबत व डम्पिंग ग्राउंड येथे प्रत्यक्षात भेटी दिल्या. ग्रामपंचायत अंतर्गत कायमस्वरूपी घनकचरा व्यवस्थापन करणे बाबत सक्त सूचना यावेळी देण्यात आल्या.

शहापूर तालुक्यातील बोर शेती, वाफे आणि चेअरपोली ग्रामपंचायत भेट देऊन तेथील डम्पिंग ग्राउंडला भेट दिली. शहरालगत आणि हायवे लगतच्या ग्रामपंचायतीं मधील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कायमस्वरूपी उपाययोजना करणे बाबतही उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्यासमवेत चर्चा करण्यात आली. शहापूर तालुक्यातील दहिगाव येथील जेएसडब्ल्यू अंतर्गत कार्यरत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास देखील भेट देऊन तेथील प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रकल्प संचालक अतुल पारस्कर, भिवंडी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, विस्तार अधिकारी उप अभियंता रमेश सासे तसेच अमृत इंटरप्राईजेस संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप ग्रामपंचायतींना भेटी देण्यात आल्या. म्हारळ ग्रामपंचायत येथील नाला सेतू ट्रीटमेंट प्लांट येतील काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. वरप ग्रामपंचायत अंतर्गत तात्काळ कचरा संकलन केंद्र उभारणीसाठी नियोजन करण्यात यावे अशा सूचना गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते यांना देण्यात आल्या.




तसेच अंबरनाथ तालुक्यातील ग्रामपंचायत नेवाळी व उसाटणे येथे भेट देण्यात आली. उसाटणे येथील कचरा व्यवस्थापन केंद्राला भेट देऊन कामकाज वेळेत पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले. ग्रामपंचायत नेवाळी येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नेवाळी नाका येते प्रत्यक्ष पाहणी करून हायवे लगत कचरा टाकण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सक्त सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या. हायवे लगत कचरा टाकणाऱ्या ग्रामस्थांसाठी, शहरा लगत व हायवे मार्गे प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये कचरा संकलन केंद्र उभारावे जेणेकरून कचरा अस्तव्यस्त न पडता एकत्रित जमा करता येईल. कचऱ्यावर पुढील प्रक्रिया व व्यवस्थापन करणे सुलभ होईल असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले.

# शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेकरिता कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत आवाहन

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध घटकाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनांकरिता सन २०२३–२४ या आर्थिक वर्षासाठी दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने ज्या लाभार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केलेले आहेत, अशा लाभार्थ्यांची योजनेच्या अटी / शर्तीनुसार पडताळणी करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरून शिष्यवृत्ती योजनेकरिता ज्या लाभार्थ्यांनी योजनेच्या अटी / शर्तींनुसार परिपूर्ण अर्ज सादर केलेले नाहीत, अशा लाभार्थ्यांना यापुर्वीच लघुसंदेशाच्या माध्यमातून कळविण्यात आलेले आहे. परंतु ज्या लाभार्थ्यांनी अदयापपर्यंत सदर कागदपत्राची पूर्तता केलेली नाही, अशा लाभार्थ्यांना सात दिवसांची अंतिम मुदत देण्यात येत आहे.

त्यानुसार ज्या लाभार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेकरिता अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनी ऑनलाईन पध्दतीने याबाबत पडताळणी करावी व लघुसंदेशामध्ये (SMS) नमूद केलेल्या सूचनेनुसार कागदपत्रांची पूर्तता दि. २६ जुलै २०२४ पर्यंत करुन अर्ज पुन:श्च सादर करावा. तरी या दिनांकापर्यंत प्राप्त होणाऱ्या अर्जांची पडताळणी करुन लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येईल, तसेच जे लाभार्थी कागदपत्रांची पूर्तता दिलेल्या मुदतीमध्ये करणार नाहीत, अशा लाभार्थ्यांचे अर्ज अपात्र ठरवून निकाली काढण्यात येतील, याची कृपया नोंद घेण्यात यावी असे नवी मुंबई महानगरपालिका समाजविकास विभागाच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते डॉ. केसी डायग्नॉस्टिक्स सेंटरचे उद्घाटन

पनवेल : शहरात वैद्यकीय सुविधांच्या दृष्टिकोनातून नव्याने उभारण्यात आलेल्या डॉ. केसी डायग्नॉस्टिक्स सेंटरचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे आमदार प्रशांत ठाकूर, सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. गिरीश गुणे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस ऍड. प्रकाश बिनेदार, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, संतोष शेट्टी, राजू सोनी, तेजस कांडपिळे, समीर ठाकूर, मुकीद काझी, गणेश कडू, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, किशोर चौतमोल, कामगार नेते जितेंद्र घरत, अशोक मुंडे, सीमीरा डायग्नॉस्टीकचे डायरेक्टर डॉ. संतोष वाघचौरे, डॉ. जय किनी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, कोमल कोळी, पूजा शेट्टी यांच्यासह अनेक पदाधिकरी आणि मान्यवर उपस्थित होते.

पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी 'तुमचे आरोग्य हे आमचे प्राधान्य' हे उद्दीष्ट समोर ठेऊन पनवेल शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील साई आर्केड येथे कार्यान्वित केला आहे. या सेंटरच्या माध्यमातून २डी/४डी सोनोग्राफी, पॅथॉलॉजी, एक्स- रे, २डी इको, टीएमटी, इइजी, ईसीजी, सिटी स्कॅन, कलर डोपलर, ३डी फॉलिक्युलर स्टडी, मॅमोग्राफी आदी उत्तम दर्जाच्या सुविधा माफक दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.





महापौर पदाला शोभेल असे डॉयग्नॉस्टीक सेंटर डॉक्टर कविता चौतमोल यांनी पनवेलमध्ये सुरु केले आहे अशा शब्दात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कविता चौतमोल यांचे अभिनंदन करुन डायग्नॉस्टिक्स सेंटरच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी डायग्नॉस्टीक सेंटरच्या माध्यमातून चांगल्या पद्धतीच्या सुविधा कमीत कमी दरामध्ये आणि अतिशय विश्वासार्ह ट्रीटमेंट मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

# मिरा-भाईंदर पालिकेच्या उपायुक्तांकडे मागितली पाच लाखांची खंडणी

## भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

भाईंदर : मिरा–भाईंदर महानगरपालिकेचे उपायुक्त रवी पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे बनावट अश्लील छायाचित्र तयार करून ते प्रसिद्ध करण्याची भीती दाखवत एका इसमाने चक्क पाच लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची जबाबदारी ही उपायुक्त रवी पवार सांभाळत आहेत. मागील काही दिवसांपासून प्रशासनाने शहरातील अतिक्रमण विरोधी कारवाईला जोर दिल्यामुळे अनेक तक्रारदार हे पवार यांना संपर्क साधत आहेत. तर यातील काही जण हे विरोध म्हणून पवार यांचा द्वेष देखील करत आहे.

दरम्यान यातील एका इसमाने पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे मोबाईलच्या मदतीने बनावट अश्लील छायाचित्र तयार करून त्यांना विविध माध्यमांमार्फत पाठवण्यास सुरुवात केली आहे. इतकेच नवे तर हे छायाचित्र समाज माध्यमांवर टाकून बदनामी करणार असल्याचा मजकूर व्हाट्सअ‍ॅप तसेच महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पाठवण्यात आला आहे. याशिवाय ही बदनामी थांबवायची असल्यास थेट पाच लाख रुपये द्यावे, अशी खंडणी मागणारा व्हाट्सअ‍ॅप दूरध्वनी नुकताच पवार यांना आला आहे.

त्यामुळे संबंधित प्रकरणाची लेखी तक्रार पवार यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यावरून सोमवारी रात्री अनोळखी इसमाविरोधात खंडणी मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच खंडणी मागण्यासाठी वापरण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकाचा व ई–मेल आयडीचा तांत्रिकदृष्ट्या तपास करून आरोपीचा शोध सुरू केला असल्याची माहिती तपास अधिकारी सुधीर गवळी यांनी दिली आहे.तर एका तक्रारदारावर मला दाट संशय असून लवकरच पोलीस तपासात तो समोर आल्यानंतर त्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी प्रयत्न करीन अशी प्रतिक्रिया उपायुक्त रवी पवार यांनी दिली आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१